# राशिभविष्य- फ़ेब्रुवारी, २०१२

दादा दामले (**dadadamle@hotmail.com )**

**(१) मेष-** या राशीच्या मंडळींना नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने या महिन्याचा काळ अतिशय अनुकुल होईल. इच्छा अपेक्षा पूर्ण होण्यास काळ अनुकुल होईल. या राशीच्या कर्तूत्ववान मंडळींना बढती, मानाचे स्थान वा उच्च पद मिळण्याची शक्यता आहे. थोरामोठ्य़ांच्या ओळखीतून लाभदायक घटना घडतील. स्वतंत्र व्यापार-व्यवसाय असणारांना प्रगती व व्यवसाय वाढ या द्ष्टीने काळ अनुकुल होईल. आर्थिक लाभ होतील. वैद्यकीय व्यवसाय व औषधविक्रेते यांना तसेच वैद्यकीय व यांत्रिकतांत्रिक शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना प्रगती, प्रतिष्ठा व अर्थलाभ या दृष्टीने काळ अनुकुल होईल. पण व्यय स्थानी असलेल्या हर्षलमुळे काही अडचणी व मनस्ताप देणार्‍या घटना सहन कराव्या लागण्याची शक्यता दिसते. त्याचप्रमाणे आर्थिक लाभ हाती पडण्यात विलंब,, अडचणी, अडथळे निर्माण होतीलसे दिसते. या राशीच्या बौद्धिक संशोधन क्षेत्रात कार्यरत असणारांना प्रगतीच्या दष्टीने काळ अनुकुल होईल. आरोग्य उत्तम राहील. जीवनसाथीच्या अनारोग्यामुळे दांपत्यजीवनातील सुख्समाधानात कमतरता येणे संभवते. या राशीच्या ज्या मंडळींना वाममार्ग धन सहज मिळणे शक्य आहे त्यांनी अशा मार्गाचा अवलंब कटाक्षाने टाळावाच. शुक्राच्या अनुकुलतेमुळे कौटुंबिक जीवनात सुखशांतीसमाधान मिळू शकेल. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. या राशीच्या मंडळींना विविध कारणांनी संततिसुख मिळणे कठिण दिसते.

**(२) वृषभ-** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा काळ फ़ारसा अनुकुल नाही असेच म्हणावे लागेल. विशेष करून या महिन्याच्या दिनांक १२-१३ या दोन दिवशी जपून व सावधानतेने आचरण करावे. मानसिक रोग तज्द्न्य, द्रव पदार्थाचे व्यापारी व चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना या महिन्याचा काळ अनुकुल व लाभदायक होईल. महिन्याच्या पूर्वार्धात रवि-बुध प्रतिकुल असणार असल्यामुळे सतत मनाविरुद्ध घटना घडतील व नियोजित कार्यात अडचणी, अडथळे निर्माण होतील. त्यामुळे मानसिक ताण सहन करावा लागेल. जपा. पण उत्तरार्धात शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळींना काळ अनुकुल व प्रगतिकारक होईल. लाभस्थानी असलेल्या शुक्र-हर्षलमुळे अनपेक्षित आर्थिक लाभ होण्याची शक्यता दिसते. पण मित्रांशी मतभेद, वाद, भांडणे होण्याची शक्यता आहे. जपा. अध्यात्म व समाजसेवा क्षेत्रांत कार्यरत असणारांना प्रगती व आत्मसंतोष या दृष्टीने काळ अनुकुल होईल. पण कौटुंबिक जीवनात मात्र गैरसमज, मतभेद, वाद अशांमुळे असमाधानकारक घटना घडतीलसे दिसते. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या राहूमुळे दांपत्यजीवन्‍तील सुखसमाधानात बाधा येणे संभवते. जपा.

तसेच बुद्धी व विचार विकृत होणार नाहीत याची काळजी घ्यावी लागेल. राहती जागा व स्थावरसंबंधी त्रास सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. विद्यार्थ्यांना महिन्याचा उत्तरार्ध अनुकुल होईल.

**(३) मिथुन-** या राशीच्या मंडळींनी या महिन्याच्या काळात मनावर संयम ठेवून व सहनशील बनून आचरण केल्यास शारीरिक, मानसिक आरोग्य फ़ारसे बिघडणार नाही. करण सतत मनाविरुद्ध घटना घडण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत या राशीच्या ज्या मंडळींना अध्यात्मात रस आहे त्यांना उपासनेद्वारे मन:शांती मिळू शकेल. विशेष करून भगवान शंकराची उपासना अनुकुल होईल. यांत्रिकतात्रिक नोकरी-व्यवसाय, चिकित्सक बौद्धिक नोकरी-व्यवसाय, तसेच शास्त्रीय संशोधन क्षेत्र असणारांना काळ अनुकुल व लाभदायक होईल. काहींना परदेशगमनाचे योगही संभवतात. या राशीच्या व्यापारी मंडळींना परधर्मीयांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. या राशीच्या विद्यार्थ्यांनी मनापासून खूप अभ्यास केल्यास गुरु ग्रहाच्या अनुकुलतेने अपेक्षित प्रगती साधणे शक्य होईल. कलात्मक नोकरी-व्यवसाय व शासकीय, निमशासकीय किंवा सामान्य नोकरदार मंडळींना मात्र मानसिक ताण व असह्य मनस्तापदायक घटना घडून त्यांचे सर्व प्रकारचे आरोग्य बिघडण्याची शक्यता दिसते. जपा. तसेच कौटुंबिक जीवनात मतभेद, भांडणे होऊन गृहसौख्य मिळणे कठिण होईल. तसेच काही मंडळींना जीवनसाथीच्या तर काहींना संततीच्या अनारोग्याकडे विशेष लक्ष द्यावे लागेल. असे असले तरी गुरु ग्रहाच्या अनुकुलतेमुळे या प्रतिकुल काळाशी मुकाबला करणे शक्य होईल व महत्त्वाचे म्हणजे आर्थिक चिंता करावी लागणार नाही.

**(४) कर्क-** या राशीच्या मंडळींनी या महिन्याच्या काळात सर्व प्रकारच्या अनारोग्याची काळजी घेतली पाहिजे. कारण सतत मनाविरुद्ध घटना घडून असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता आहे. त्यामुळे उष्णता भडकून घसा, दाढा, मान दुखणे, डोळे तळावणे, तसेच अपचन, पोटाचे विकार, मूत्राशयविकार, ताप येणे अशापैकी आजार संभवतात. सामान्य नोकरदार मंडळींना आवश्यक ते अर्थसाहाय्य मिळविण्यासाठी खूप मेहनत करावी लागेल. तसेच नव्या आर्थिक जबाबदाऱ्या येऊन पडण्याची शक्यता दिसते. महिन्याच्या उत्तरार्धात जीवनसाथीचे व मुलांपैकी कोणाचे अनारोग्यामुळे चिंतित व्हाल. या राशीच्या गर्भवती स्त्रियांनी अकारण दगदग करू नये. स्थावर संपत्ती असेल तर त्यासंबंधी वाद निर्माण होणे संभवते. त्यामुळे वा अन्य कारणाने गहसौख्यात, कौटुंबिक सुखात व संततिसुखात बाधा पडण्याची शक्यता दिसते. जपा. पण गुरु ग्रहाच्या अनुकुलतेमुळे नोकरी-व्यवसायात सुखसमाधानकारक घटना घडतील. विशेष करून बौद्धिक कार्यक्षेत्र व शास्त्रीय संशोधन क्षेत्रात कार्यरत असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक

होईल. तसेच दलाली, कमिशनवर व्यसाय असणारांनाही काळ लाभदायक होईल. शुक्राच्या अनुकुलतेमुळे गुरुकृपा, चांगल्या लोकांचा सहवास लाभेल व त्यामुळे सात्विक सुखसमाधान लाभेल. या राशीच्या काही मंडळींना परदेशगमनाचे किंवा दूरच्या प्रवासाचे योग येतील.

**(५) सिंह-** मानी, हटवादी व जिद्दी स्वभावामुळे व मानापमान फ़ार असल्यामुळे या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या काळात शरीरपीडा, दगदग व कठिण परिश्रम करावे लागतील व त्यामुळे उष्णता भडकून सर्व प्रकारचे अनारोग्य सहन करावे लागण्याची शक्यता दिसते. तसेच कौटुंबिक सुख व गृहसौख्य मिळणे कठिण होईल. महिन्याच्या उत्तरार्धात रवि-बुध-नेपच्यून प्रतिकुल होणार असल्यामुळे दांपत्यजीवनात विरोध, मतभेद यांमुळे मनस्ताप होऊन गहरे नैराश्य येणे संभवते. जपा. पण अध्यात्मिक वृत्ती असेल व मनावर सहनशीलता आणि संयम राखण्याचे संस्कार असतील तर आपल्या प्रिय दैवताच्या कृपेने विरोधी परिस्थितीची धार बोथट होईल व गुरु-शुक्राच्या अनुकुलतेमुळे होणाऱ्या विविध प्रकारच्या लाभांचा आनंद लुटता येईल. तरीही हर्षलमुळे सर्व प्रकारच्या अपघातांचे भय आहेच. त्यासाठी सतत सावधानतेने आचरण करावेच लागेल. सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळींना महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल आहे.उत्तरार्धात प्रतिकुल परिस्थिती निर्माण होईल. बेफ़िकीरपणे आचरण केल्यास नोकरीवर गदा येण्याची शक्यताही नाकारता येत नाही. जपा.शनिमुळे या राशीच्या युवकांना उत्तम नोकरी किंवा अपेक्षित कार्यक्षेत्र मिळणे संभवते. मात्र त्यासाठी नम्रतेचे आचरण करावे लागेल.

**(६) कन्या-** या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या पूर्वार्धात रवि-बुध हे दोन ग्रह प्रतिकुल असणार आहेत. त्यामुळे जीवनाच्या सर्वच क्षेत्रात प्रतिकुल परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता दिसते. मन सतत अस्वस्थ राहील. गैरसमजुती, वाद, भांडणे यांमुळे नको हे जीवनअसे वाटू लागेल. व्ययस्थानी असलेल्या मंगळामुळे काही जुनी दबली गेलेली प्रकरणे असतील तर ती पुन्हा उकरली जाऊन असह्य मनस्ताप सहन करावा लागेल. शनिदेवांच्या साडेसातीचा काळ आहे याची जाणीव ठेवून सतत मन व बुद्धी शांत ठेवू शकलात तरच काही प्रमाणात सुखसमाधान लाभू शकेल. धनस्थानी असलेल्या शनिमुळे कौटुंबिक जीवनात खळबळजनक घटना घडण्याची शक्यता दिसते. तसेच कोर्ट प्रकरणे असतील तर या राशीच्या काही मंडळींना आर्थिक समस्या त्रस्त करतील. या राशीच्या काही मंडळींना काल्पनिक चिंतांचाच असह्य त्रास सहन करावा लागेल तर काहींना आपल्याला काही आजार झाला असल्याची भावनाच त्रस्त करील. काहींना संततीचे आजार वा अन्य समस्या यामुळे संततिसुख लाभणे अशक्य होईल. जपा. या राशीच्या ज्या मंडळींचा भागीदारीत व्यापार-व्यवसाय असेल त्यांनी गैरसमज, संशय अशा कारणांमुळे

भागीदारी व्यवसायात बाधा येणार नाही, याची काळजी घ्यावी. या राशीच्या व्यापारी मंडळींना स्त्री ग्राहकांकडूनच अधिक लाभ होणे संभवते. महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या नोकरदार मंडळींना काळ अनुकुल व लाभदायक होईल. तसेच ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी कोणाला अचानक धनलाभ वा अन्य प्रकारचे भरघोस लाभ होण्याची दाट शक्यता आहे.

**(७) तुळा-** या राशीच्या मंडळींना या महिन्याचा काळ प्रतिकुल असाच आहे. महिन्याच्या पूर्वार्धात रवि-शनि केंद्र योग कौटुंबिक सुखाचे दृष्टीने मनस्ताप देणारा असाच सिद्ध होईल. काहींच्या कुटुंबात स्थलांतर होऊन दुरावा निर्माण होईल; तर काहींच्या कुटुंबात वाद, भांडणे होऊन दुरावा निर्माण होईल. जपा. स्वत:चे व जीवनसाथीचे अनारोग्य, आर्थिक चिंता, काही मंडळींना आवश्यक अर्थप्राप्तीसाठी अपार कष्ट-परिश्रम करावे लागतील व त्यामुळे त्यांना गहरे नैराश्य येईल. महिन्याच्या पूर्वार्धात हाती घेतलेल्या प्रत्येक कार्यात विलंब, घोटाळे मनस्ताप, अपयश सहन करावे लागण्याची शक्यता आहे. महिन्याच्या उत्तरार्धात नोकरीत वरिष्ठांचा त्रास सहन करावा लागेल. नातेवाईक मंडळीत काही कारणाने दुरावा निर्माण होणे संभवते. जपा. त्यामुळे मन अस्वस्थ होईल. मुलांच्या आचरणविषयक समस्या त्रस्त करतील. तसेच काही कारणाने मैत्रीत वितुष्ट निर्माण होणेही संभवते. असे असले तरी गुरु-मंगळ शुभ योगामुळे या राशीच्या काही भग्यवंत मंडळींना मौल्यवान वस्तूंचा लाभ होईलसे दिसते. या राशीच्या सप्तम स्थानी असलेल्या गुरुमुळे या राशीच्या विवाहेच्छू युवक-युवतींचे विवाह ठरतील. स्वत:चा स्वतंत्र व्यापार-व्यवसाय असणाऱ्या मंडळींना अपेक्षित अर्थलाभ व्होईल. या राशीच्या गर्भवती स्त्रियांना पुत्रप्राप्तीची शक्यता दिसते. तसेच चिकित्सक बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यरत असणारांना व सर्व प्रकारच्या कलाक्षेत्रातील मंडळींना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. अध्यात्मात रस असेल त्यांना उपासनेत प्रगती करण्यास काळ अनुकुल होईल. श्रद्धा असेल तर शिवोपासना अनुकुल होईल व त्यामुळे मन शांत राहील.

**(८) वृश्चिक-** या राशीच्या मंडळींचा शनिच्या साडेसातीचा काळ सुरू आहे. सध्या शनि या राशीच्या व्ययस्थानी असल्यामुळे या राशीच्या मंडळींनी सतत सावधानतेने, मन व बुद्धी स्थिर ठेवून आणि सहनशील बनूनच आचरण केले पाहिजे. सतत मनाविरुद्ध घटना घडणे, आर्थिक व्यवहारात फ़सवणूक होणे, मानहानी होणे अशापैकी घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे गहरे नैराश्य येईल. आरोग्य बिघडेल. काहींना वातविकारांचा त्रास सहन करावा लागेल. जपा. या राशीच्या व्यापारी मंडळींनी विशेष काळजी घेऊन व्यवहार करावेत. कोर्टप्रकरणे असतील तर ती समझोत्याने मिटविण्याचा

प्रयत्न करा. या राशीच्या नोकरदार मंडळींना महिन्याचा पूर्वार्धच अधिक अनुकुल व लाभदायक होईल. वैद्यकीय व्यवसाय, यांत्रिकतांत्रिक व्यवसाय, औषध विक्रेते, उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन क्षेत्र  अशा कार्यक्षेत्रांत कार्यरत असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. महिन्याच्या उत्तरार्धात दांपत्यसुख, कौटुंबिक सुख व संततिसुख लाभण्यात वाद, गैरसमज, अनारोग्य अशापैकी कारणांनी बाधा येणे संभवते. जपा. साहित्य व कलाक्षेत्रांतील विद्यार्थ्यांना प्रगतीच्या दृष्टीने काळ अनुकुल होईल. पण नैराश्य झटकून व दिवास्वप्ने पाहण्यात वेळ न गमावता मनापासून अध्ययन केले पाहिजे. मनाला आधार व शांती मिळावी यासाठी श्रद्धेने हनुमानाची उपासना करा." हनुमानचालिसा" स्तोत्र नियमित श्रद्धेने पठण करा.

**(९) धनु-** या राशीच्या मंडळींना या महिन्याच्या काळात बुध ग्रह बऱ्याच प्रमाणात प्रतिकुल असून रवि ग्रह महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुल असेल. त्यामुळे महिन्याच्या पूर्वार्धात खर्चाचे प्रमाण वाढण्याची शक्यता आहे. तसेच आर्थिक नुकसान, फ़सवणूक असे काही घडण्याची शक्यता दिसते. आप्तेष्टात भांडणे होणे, त्यामुळे शारीरिक उष्णता बळावून काहींना नेत्रविकाराचा त्रास होणे संभवते. जिभेवर ताबा ठेवलात तर विरोध, शत्रुत्व वाढणार नाही. नपेक्षा शत्रुभय आहेच. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळींना विविध प्रकारचे लाभ होतीलसे दिसते. सध्या या राशीच्या मंडळींचे मन अत्यंत भावनाशील झाले आहे. त्यामुळे अध्यात्मात रस असणारांना उपासनेद्वारे मन:शांती मिळविणे शक्य होईल. ज्यांना गूढ गोष्टींबाबत ओढ आहे त्यांना गूढ उकलण्यात यश मिळू शकेल. काही मंडळींना परदेशगमनाची तर काहींना जलप्रवासाची संधी मिळेल. पण प्रवासात त्रास व मनस्ताप होणे संभवते. स्वभावाला मुरड घातलीत तर शुक्रच्या अनुकुलतेने कौटुंबिक सुख व गृहसौख्य मिळू शकेल. शेतीचा व्यवसाय असणारांना ह्या शुक्राच्या अनुकुलतेमुळे विविध प्रकारचे लाभ होतील. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल आहे. पण या राशीच्या मंडळींना मात्र अपेक्षित संततिसुख मिळण्याची शक्यता दिसत नाही. गुरु दत्तात्रेयाची उपासना अनुकुल होईल.

**(१०) मकर-** या राशीच्या मंडळींना रवि-मंगळ-बुध व काही प्रमाणात शनि हे महत्त्वाचे ग्रह या महिन्याच्या काळात प्रतिकुल असणार आहेत. त्यामुळे कष्ट-दगदग होऊन सर्व प्रकारचे अनारोग्य होण्याची दाट शक्यता आहे. रवि-मंगळामुळे शारीरिक उष्णता भडकून डोळ्याची दुखणी, अन्य उष्णताविकार, मूळव्याध अशा प्रकारचे आजार होण्याची शक्यता दिसते. तसेच असह्य मनस्तापामुळे काहींचा रक्तदाब वाढण्याची शक्यता आहे. ज्यांना हृदयविकार आहे त्यांनी तर अकारण विचार न करता मन सतत शांत ठेवण्याचा प्रयत्न

केला पाहिजे. महिन्याच्या उत्तरार्धात बिकट आर्थिक समस्या निर्माण होतील व त्यात भर म्हणून आप्तेष्टांशी भांडणे झाल्यास असह्य मनस्ताप सहन करावा लागेल. जपा. मंगळामुळे अपघातभय आहेच. त्यासाठी सतत सावधानतेचे आचरण करा. वाहन नियंत्रणात चालवा. जलभय,वीजभय आहे. जपा. शुक्राच्या अनुकुलतेने या राशीच्या काही भाग्यवंतांना प्रतिष्ठा, मान किंवा धनलाभ वा भूमिलाभ होण्याची शक्यता आहे. या राशीच्या व्यापारीवर्गाला स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक लाभ होईल. हर्षलमुळे उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन क्षेत्रात कार्यरय असणारांना प्रगती व यश साधणे शक्य होईल. गुरुमुळे कौटुंबिक सुखसमाधान मिळेल; पण नातेवाईकाकडून मनस्ताप सहन करावा लागेल. जपा. या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळे निर्माण होतीलसे दिसते. तसेच या राशीच्या मंडळींना अपेक्षित संततिसुख मिळेलच याची खात्री नाही. या राशीच्या नोकरदार मंडळींना व स्वतंत्र व्यवसाय करत असणारांना काळ प्रतिकुलच असेल.

**११) कुंभ-** सध्या या राशीच्या मंडळींचे मन अतिशय कोमल व भावनाशील झाले असण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे मनाविरुद्ध काहीही घडले तरी लगेच गहरे नैराश्य येत असावे. त्यातही इतरांशी पटवून घेण्याचा स्वभाव नसेल तर अधिकच मनस्ताप होईल. या राशीच्या शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळींना काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. लेखकवर्गाला काळ अनुकुल असून काही लेखकांचे ग्रंथही प्रसिद्ध होतीलसे दिसते. मात्र या राशीच्या सर्वांनीच जिभेवर नियंत्रण ठेवून, मनावर संयम राखून व सहनशील बनून आचरण केले पाहिजे. तसेच अविचाराने खर्च होणार नाही, याची काळजी घ्या. तरच शुक्र ग्रहाच्या अनुकुलतेचा लाभ उठवणे शक्य होईल. मंगळामुळे वैवाहिक जीवनात कटकटी निर्माण होतील. गैरसमजाने कुटुंबात वाद, भांडणे होतील. तसेच जीवनसाथीच्या अनारोग्यामुळे चिंता निर्माण होणे संभवते. जपा. कोर्ट प्रकरणे असतील तर ती पुढे ढकलण्याचा प्रयत्न करा. नपेक्षा अपयश येण्याचीच दाट शक्यता आहे, त्याचप्रमाणे भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांनी गैरसमज वा संशय यामुळे भागीदारीत बाधा येणार नाही याची काळजी घ्यावी, या राशीच्या भाग्यस्थानी असलेला शनि फ़ारसा प्रतिकुल होणार नाही. त्याच्यामुळे काहींना दूरच्या प्रवासाचे योग येतील. श्रद्धा असेल तर आध्यात्मिक उपासनेद्वारे मन:शांती व सात्विक सुखसमाधान मिळू शकेल.

**(१२) नमी-** या राशीची लहान मुले सध्या अतिशय हूड व व्रात्य झली असल्याचा अनुभव या राशीच्या मंडळींना येत असला पाहिजे. तसेच या राशीच्या मंडळींचा स्वभावही अतिशय चंचल, लहरी व विक्षिप्त झाला असावा, असे दिसते, त्यात कसल्याही प्रकारचे दडपण सहन होत नसावे, असे वाटते. आपला स्वभाव शांत, स्थिर ठेवून इतरांची मते, विचार ऐकून घेतलेत व जिभेवर ताबा ठेवलात तर खूपच सुखाचे होईल. शास्त्रीय संशोधन व उच्च

बौद्धिक क्षेत्रातील मंडळींना अपेक्षित प्रगती करणे व यश मिळवणे शक्य होईल. शिवाय गुरु ग्रहाच्या अनुकुलतेने सर्व प्रकारचे आरोग्य उत्तम राहून उत्तम अर्थलाभ होतील, या राशीच्या सर्व नोकरदार मंडळींना व स्वतंत्र व्यवसाय असणारांना महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल व लाभदायक होईल. महिन्याच्या उत्तरार्धात मनाविरुद्ध घटना घडतील व मन अस्वस्थ राहील. पण गुप्त पोलीसखात्यात कार्यरत असणारांना महिन्याचा उत्तरार्धही अनुकुलच होईल. या राशीच्या व्यापारी मंडळींना स्त्री-ग्राहकांकडूनच अधिक अर्थलाभ होईल. वैद्यकीय संशोधन क्षेत्र, औषध विक्रेते, यांत्रिकतांत्रिक व्यवसाय असणारांना सुद्धा महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल व लाभदायक होईल. मात्र वरील सर्व अनुकुल बाबी सर्व प्रकारचे आरोग्य उत्तम राहिल्यासच प्राप्त होतील कारण या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या शनिमुळे अनारोग्य होण्याची, सतत अपेक्षाभंग होण्याची व मन अस्वस्थ राहण्याची शक्यता आहे. जपा.

=====००००००=====